दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •


कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४२ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२५ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याचा ठराव एकमताने संमत

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

### आ.मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे व सर्व विधीमंडळ सदस्यांचे मानले आभार




**चंद्रपूर (प्रतिनिधी):** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर 'भारतरत्न' देण्याचा ठराव सोमवार, दि. २४ मार्चला विधानसभेत एकमताने पारीत झाला.महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना 'भारतरत्न' देण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा ठराव महाराष्ट्र विधानसभेत एकमताने संमत झाला. हा केवळ ठराव नाही, तर वंचितांच्या वेदनांना सन्मान, शिक्षणक्रांतीला सलाम आणि समतेच्या मूल्यांचा जयघोष आहे. हा जनतेचा आवाज आहे, अशी भावना आ.मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

संपूर्ण देशवासीयांच्या जनभावनेचा आदर करणारा हा ठराव सर्वानुमते मंजूर होण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व विधीमंडळ सदस्यांचेही त्यांनी आभार मानले आहेत. आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी गेल्या आठवड्यात विधानसभेत या संदर्भात अशासकीय ठराव मांडला होता. या ठरावाला उत्तर देताना राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी यासंदर्भात पुढील आठवड्यात विधानसभेत ठराव संमत करणार असल्याची घोषणा केली होती. शिक्षण नावाचं अद्भुत अमृत ज्या महान व्यक्तिमत्वामुळे आपणा सर्वांना प्राशन करता आले, ते या भारतातील महान रत्न जगभरात भारतरत्न' म्हणून ओळखले जाणे आपल्यासाठी गौरवाची बाब ठरणार आहे, असं ते प्रस्ताव मांडताना म्हणाले होते. त्यानंतर आज, सोमवार, दि. २४ मार्चला विधानसभेत एकमताने ठराव मंजूर झाला आहे. हा ठराव विधानपरिषदेत मांडण्यात येणार आहे.

#### ऐतिहासिक क्षण

विधानसभेत एकमताने ठराव मंजूर होणे हा जनभावनेचा सन्मान करणारा आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांना उजाळा देणारा ऐतिहासिक क्षण ठरला आहे. या ठरावामागे संपूर्ण महाराष्ट्राची सामूहिक इच्छाशक्ती आहे. हा निर्णय जनभावनेचा सन्मान करणारा क्षण आहे,' अशी प्रतिक्रिया आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.




#### फुले दाम्पत्याचे योगदान

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांसाठी आणि दलित-वंचित घटकांसाठी शिक्षणाची दारे उघडून दिली, ती त्या काळातील अभूतपूर्व क्रांती होती. पुण्यात सुरू झालेली मुलींची पहिली शाळा हे केवळ शिक्षणाचे नव्हे तर समतेच्या प्रवासाचे पहिले पाऊल होते. आज महिलांनी देशाच्या प्रत्येक क्षेत्रात केलेल्या यशस्वी वाटचालीमागे फुलेंच्या शिक्षणविषयक दृष्टीकोनाची मोठी भूमिका आहे. त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी आजच्या आधुनिक भारतात स्त्रीशक्तीच्या प्रगतीचा पाया ठरली आहे, असे आ. मुनगंटीवार म्हणाले.

#### सातत्याने पाठपुरावा

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सातत्याने आणि प्रभावीपणे संसदीय संघर्ष करत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेला. त्यांच्या प्रयत्नांमुळे फुले यांचे वारसदार शासकीय नोकरीस पात्र ठरले. तसेच, पुणे विद्यापीठाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे गौरवपूर्ण नाव देण्यात मोलाची भूमिका बजावली.

# चांगल्या कामांत सुधीरभाऊ नेहमी पुढे-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## गायत्री परिवारतर्फे मुंबईत दिव्य अखंड दीप शताब्दी सोहळा उत्साहात

**चंद्रपूर (प्रतिनिधी):** गायत्री परिवाराच्या वतीने आयोजित दिव्य अखंड दीप महायज्ञ आणि दिव्य ज्योती कलश पूजन सोहळ्यात प्रज्वलित झालेल्या दीपांच्या उजेडाने जीवनातील अंधःकार नाहीसा होईल, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. समाजात रोज मनामध्ये राम आणि रावण यांचे युद्ध होत असते. या संघर्षात रामच जिंकला पाहिजे, ही गायत्री परिवाराची शिकवण राष्ट्रनिर्माणासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.



मुंबईतील मुलुंड येथे झालेल्या या भव्य सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. चिन्मय पंड्या, आमदार मिहिर कोटेचा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्याची प्रशंसा करताना ते चांगल्या कामांत नेहमी अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार काढले.गायत्री परिवाराच्या या महायज्ञाच्या निमित्ताने आत्मशुद्धी, धर्म आणि राष्ट्रहिताच्या संकल्पना उपस्थितांसमोर मांडताना मुनगंटीवार म्हणाले, संपूर्ण जग जिंकणाऱ्या सिकंदराने मृत्यूपूर्वी सांगितले होते की, कफन पेटीच्या बाहेर माझे दोन्ही हात ठेवा, जेणेकरून लोकांना समजेल की तो रिकाम्या हाताने जात आहे. मात्र, आपली भारतीय संस्कृती अधिक व्यापक आहे. आत्मा कधीच रिकाम्या हाताने येत नाही आणि जातही नाही. पूर्वसंचिताचे संस्कार आत्मा पुढील जन्मातही घेऊन जातो. त्यामुळे धन शेवटच्या श्वासापर्यंत उपयोगी ठरते, पण धर्माचा संस्कार पुढील जन्माच्या पहिल्या श्वासापासूनच महत्त्वाचा ठरतो.रामराज्याच्या संकल्पनेबाबत विचार मांडताना मुनगंटीवार म्हणाले, लहानपणी शाळेत असताना शिक्षक रामराज्याची महती सांगायचे. महात्मा गांधीजींनीही रामराज्याचे स्वप्न पाहिले. त्यावेळी विज्ञान, संगणक, पिझ्झा हट नव्हते, तरीही रामराज्याची गरज का आहे, हा प्रश्न मला पडायचा. पण नंतर उमगले की झगमगाट हा केवळ बाह्य समाधानासाठी असतो, तर रामराज्य मनःशांतीसाठी आवश्यक आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या विविध कार्यांची प्रशंसा करताना सांगितले की, छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रातील गडकिल्ले आणि मंदिरांचे संवर्धन करण्यासाठी सुधीरभाऊंनी मोठे कार्य केले आहे. मागील वर्षी नवी मुंबईत भव्य अश्वमेध यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. त्या यज्ञाचे कर्ताधर्ता सुधीरभाऊ होते. समाज आणि धर्महिताच्या प्रत्येक कार्यात ते नेहमी पुढे असतात. गायत्री परिवाराने अध्यात्म आणि समाजसेवेच्या माध्यमातून जनकल्याणाची दिशा दिली आहे. या शताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने देशभरातून अनेक साधक, संत आणि समाजसेवक मुंबईत एकत्र आले होते. दीप महायज्ञाच्या माध्यमातून आत्मिक उन्नतीसाठी प्रेरणा देण्याचे कार्य गायत्री परिवार सातत्याने करत आहे.या भव्य सोहळ्यात दीपप्रज्वलनाच्या माध्यमातून अंधःकार हटवण्याचा आणि सकारात्मक ऊर्जेला बल मिळवण्याचा संदेश देण्यात आला. धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय उन्नतीच्या या पर्वात सुधीर मुनगंटीवार यांचा सक्रीय सहभाग महत्त्वपूर्ण ठरला.

# प्रशांत कोरटकर अखेर ताब्यात २५ फेब्रुवारीपासून होता फरार

## तेलंगणाच्या मंचारियालमधून ताब्यात घेतले; कोल्हापुरात आणले जाणार

**मुंबई (वृत्तसंस्था):** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्र पोलिसांनी त्याला तेलंगणातील मंचारियालमधून दुपारी २:४५ वाजता ताब्यात घेतले असून पोलिसा कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. प्रशांत कोरटकरला उद्या कोल्हापूर न्यायालयात हजर करण्यात येणार आहे, अशी माहिती कोल्हापूरचे एसपी महेंद्र पंडीत यांनी दिली.



प्रशांत कोरटकरवर इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याचा व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिस गत २५ फेब्रुवारीपासून त्याचा शोध घेत होते. पण तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी सोमवारी त्याला तेलंगणातून ताब्यात घेतले. तेलंगणात त्याच्या अटकेची योग्य ते सोपस्कार पार पाडल्यानंतर त्याला कोल्हापुरात आणले जाईल. प्रशांत कोरटकरवर कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्याला तिथे आणले जाईल.प्रशांत कोरटकरचा नागपूर, इंदूर, मुंबई, चंद्रपूर येथे शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके गठीत केली होती. सदर आरोपीचा अटकपूर्व जामीन देखील कोल्हापूर न्यायालयाने फेटाळला होता. आज देखील आरोपीच्या अटकपूर्व जामीनावर सुनावणी होती. दुपारी साडेचार वाजता ही सुनावणी होणार होती. परंतु, त्याआधीच कोल्हापूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीनाचा अर्ज न्यायालयाने रद्द केलेला आहे. दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी प्रशांत कोरटकरला ताब्यात घेतले असून पोलिसांचे पथक त्याला घेऊन कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. रात्री उशिरा आरोपीला कोल्हापुरात आणल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पाडून उद्या न्यायालयासमोर हजर केले जाईल, अशी माहिती कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

# वरोरा उपजिल्हा रुग्णालयात ३ डी सोनोग्राफी मशीन आणि तज्ज्ञ डॉक्टर नियुक्तीची मागणी

**नागपूर (प्रतिनिधी):** वरोरा उपजिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक ३ डी सोनोग्राफी मशीन, एछढ (कान-नाक-घसा) तज्ज्ञ आणि त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टर नियुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. युवा सेना कार्यकर्त्यांनी २३ मार्च रोजी नागपूर दौऱ्यावर असलेल्या सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन दिले.

युवा सेना कार्यकारिणी सदस्य आलेख रमेश रट्टे, हर्षद शिंदे, चंद्रपूर जिल्हा प्रमुख शैलेश केलझरकर, अमित गावंडे आणि भूषण जाधव यांनी मंत्री आबिटकर यांची भेट घेत ही मागणी मांडली.सध्या रुग्णालयातील जुने सोनोग्राफी मशीन अचूक निदान करण्यास अकार्यक्षम झाले आहे. त्यामुळे गर्भवती महिलांसह इतर गंभीर रुग्णांना खासगी दवाखान्यांमध्ये महागड्या तपासण्या करून घ्याव्या



लागत आहेत. तसेच, एछढ आणि त्वचारोग तज्ज्ञ डॉक्टर नसल्याने रुग्णांना इतरत्र जावे लागते. या निवेदनावर मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, लवकरच कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अकोले येथे जागा उपलब्ध झाल्यास 'उमेद मॉल' महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**अकोले (प्रतिनिधी):** महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी राज्यात ५० 'उमेद मॉल' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, अकोले येथे जागा उपलब्ध झाल्यास उमेद मॉल मंजूर केला जाईल, असे आश्वासन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

त्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), महिला व बालविकास विभाग, पंचायत समिती आणि आमदार किरण लहामटे यांच्या निधीतून आयोजित 'कळसुबाई' महिला बचतगटांच्या वस्तू विक्री व प्रदर्शन महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. यावेळी आमदार किरण लहामटे, पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपेरे, अगस्ती सहकारी साखर कारखान्यांचे चेअरमन सिताराम गायकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राहुल शेळके, जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे, उमेद जिल्हा अभियान व्यवस्थापक सोमनाथ जगताप, तहसीलदार सिद्धार्थ मोरे, गटविकास अधिकारी अमर माने



आदी मान्यवर उपस्थित होते.

अदिती तटकरे यांनी सांगितले की, नागपूर शहरातील ३० हजार महिलांनी या योजनेच्या मदतीने पतसंस्था स्थापन केली असून, त्यामध्ये ३५ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. या धर्तीवर इतर जिल्ह्यांतील महिलांनीही आर्थिक विकासासाठी एकत्र येऊन पतसंस्था सुरू कराव्यात, असे त्यांनी आवाहन केले. राज्यात २ कोटी ४७ लाख महिलांना 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळाला असून, अकोले तालुक्यात ८३ हजार महिलांना या योजनेचा फायदा मिळाला आहे. राज्यात सर्वाधिक नोंदणी पुणे जिल्ह्यात झाली असून, त्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्याचा क्रमांक लागतो, असेही त्यांनीसांगितले. महिलांनी स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे, कारण त्यांच्या आरोग्यावर संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याची जबाबदारी असते. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची मोफत आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच 'उमेद'चा फिरता निधी १५ हजारांवरून ३० हजार करण्यात आला आहे, तर 'लखपती दीदी' आणि 'ड्रोन दीदी' उपक्रमाचा लाखो महिलांना लाभ मिळाला आहे, असे तटकरे यांनी सांगितले. या वेळी 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळालेल्या सुरेखा चौधरी, सुजाता अस्वले आणि शीला इथे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच महिलांना कर्ज योजनेच्या लाभाचे धनादेश वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रारंभी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महिला बचतगटांच्या स्टॉलला भेट देत महिलांशी संवाद साधला. या प्रदर्शनात विविध बचतगटांचे १०० स्टॉल लावण्यात आले आहेत.या उपक्रमामुळे महिला आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने पुढे जात असून, त्यांना शासनाच्या योजनांचा मोठा आधार मिळत आहे.

# विमानतळ,हेलिपॅड आणि इंटरसिटी रेल्वेसाठी लढा-खासदार नीलेश लंके यांचा निर्धार

## खा.नीलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली नगरला महत्वपूर्ण बैठक



**पारनेर । प्रतिनिधी**

नगर-पुणे इंटरसिटी रेल्वे सेवेबाबत सकारात्मक चर्चा सुरू असून ही सेवा लवकरच सुरू करण्यासाठी प्रयत्न आहेत. त्यामुळे औद्योगिक वसाहती, शिक्षण संस्था,आरोग्य सेवा तसेच धार्मिक पर्यटनास चालना मिळेल. नगर-मुंबई हेलिकॉप्टर सेवा सुरू करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असून जिल्हयासाठी विमानतळाची गरज असल्याने जिल्हयाच्या सर्वांगीण विकासासाठी या गोष्टी महत्वपुर्ण असल्याने त्यासाठी लढा दिला जाईल असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी केला. नगर शहर व जिल्हयाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आर्किटेक्टस, इंजिनिअर्स ण्ड सर्वेअर्स असोसिएशन, द इंस्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स आणि बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया या संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत खा. नीलेश लंके यांची नगर शहरात महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत खा.लंके यांनी शहर तसेच जिल्ह्याच्या विकासातील अडचणी जाणून घेतल्या व उपाययोजना कशा करता येईल यासंदर्भात या चर्चा करण्यात आली.

या बैठकीत विविध संस्थांनी शहराच्या विकाससमोरील अडथळयांबाबत माहिती दिली. रक्षा मंत्रालयाच्या अटी, पुरातत्व विभागाचे निर्बंध, टाऊन प्लॅनिंगमधील भ्रष्टाचार तसेच रेड आणि ब्लू लाईनसंबंधीच्या नियमांमुळे शहराचा विकास ठप्प होत असल्याचे मुद्दे यावेळी मांडण्यात आले. क्रेडाईच्या प्रतिनिधींनी सिना नदीच्या रेड आणि ब्लू लाईनच्या अटींमुळे बांधकाम आणि शहराचा विस्तार अडखळल्याची तक्रार केली. नगर शहरास पुराचा फारसा धोका नसतानाही हे नियम लागू केल्याने विकास प्रक्रियेत अडथळे येत आहेत. जलसंपदा विभागाकडे हा विषय उपस्थित करून आवष्यक त्या सुधारणा करण्याची यावेळी मागणी करण्यात आली. एईएसए संस्थेने संरक्षण मंत्रालयाशी संबंधित समस्या मांडल्या. नगर शहर कोणत्याही कन्स्ट्रक्शन झोनच्या यादीत नसतानाही बांधकाम परवानग्या देताना अडचणी येत आहेत. तसेच पुरातत्व विभागाने काही स्मारकांना संरक्षित स्थळांचा दर्जा दिल्यामुळे त्या ठिकाणी विकास कामांवर निर्बंध आल्याकडे यावेळी खा. लंके यांचे लक्ष वेधण्यात आले. यावेळी करण्यात आलेल्या विविध मागण्यांची दखल घेत पुढील उपाययोजना करण्याची ग्वाही खा. लंके यांनी यावेळी दिली. या बैठकीत उपस्थित संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी खा. नीलेश लंके यांनी लोकसभा निवडणूकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांची पुर्तता केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या बैठकीस या संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये अतुल आत्रे, रामनाथ वैराहर, हरीश इंगळे, अमित मुथा, विनोद काकडे, गिरीश अग्रवाल, आदिनाथ दहीफळे, संजय गुंदेचा, यश शाह, विजयकुमार पाडीर, दीपक दारे, अभय राजे, बबन खैरे, दीपक विधाते, प्रकाश गांधी, दादासाहेब करंजुले, राहुल शिंदे, भारत गोडसे, प्रीतम भंडारी, गिरीष जाधव, विक्रम राठोड, नगरसेवक योगिराज गाडे यांचा समावेश होता.

### औद्योगिक वापराच्या वीजेचे दर कमी हवेत

**इंजिनिअर संघटनांच्या वतीने औद्योगिक क्षेत्रातील वीज दर कमी करण्याची मागणी केली. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील व्यवसायिक आणि औद्योगिक वीज वापराचे दर अधिक असल्याने उद्योगधंद्यांना फटका बसत आहे. संपूर्ण देशभर एकसमान वीज दर लागू करण्यासाठी प्रयत्न करण्याचे साकडे यावेळी खा. लंके यांना यावेळी घालण्यात आले.**

### ठेकेदारांच्या प्रलंबित बिलांसाठी पाठपुरावा करा

**बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींनी गव्हर्नमेंट कॉन्ट्रक्टरर्सच्या प्रलंबित बिलांसदर्भात प्रश्न उपस्थित केला. सहकारी विभागाकडून होणा-या विलंबामुळे अनेक ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडले असून काहींवर आत्महत्या करण्याची वेळही आली आहे. या समस्येवर त्वरीत तोउगा काढण्यासाठी पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

# शहीद दिनानिमित्त गंगाखेड येथे 'चला चार्वाक समजून घेऊया' चर्चासत्र संपन्न



**गंगाखेड । प्रतिनिधी**

चार्वाक दर्शन मंच, गंगाखेड यांच्या वतीने शहीद दिनाच्या निमित्ताने 'चला चार्वाक समजून घेऊया' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात मा. म. देशमुख यांच्या आदरांजलीने करण्यात आली. यानंतर किर्तनकार, लेखक आणि अभ्यासक कॉ. नितीन सावंत यांनी चार्वाक दर्शन आणि विचारांचा गौरवशाली इतिहास मांडला.

कॉ. ओंकार पवार यांनी भगतसिंग हे चिकित्सक आणि वास्तववादी विचारांचे अनुसरण करणारे क्रांतिकारी चार्वाक होते, असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संदीप जाधव यांनी केले.या चर्चासत्रात डॉ. शैलेश कदम, सुंदर जाधव, युवराज पारांडे, आत्माराम मुठाळ, कृष्णा गायकवाड, पृथ्वीराज चौधरी, सुरेश कोरडे, भागवत जाधव, सुधाकर आडकीने, गंगाधर गारचिले, वैजनाथ साळवे, मोतीराम चौरे, नाना कोद्रीकर, सिद्धोधन भालेराव, अंकुश कांबळे, सिद्धोधन सूर्यवंशी, सुभाष शिंदे, कॉ. योगेश फड, किशोर मस्के यांच्यासह अनेक समविचारी कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# वरोरा शहरात पोलिसांचा रूट मार्च व शांतता समितीची बैठक

**वरोरा । प्रतिनिधी**

नागपूर येथे घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर वरोरा शहरात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनी २२ मार्च रोजी सायंकाळी सतर्कता मोहीम राबवली. याअंतर्गत शहरात रूट मार्च काढण्यात आला. हा रूट मार्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पद्मावार चौक, डोंगरवार चौक, मित्र चौक, कामगार चौक, नेहरू चौक, कच्छी मस्जिद आणि पुन्हा आंबेडकर चौक या मार्गावर पार पडला. पोलीस निरीक्षक अजिंक्य तांबडे यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अधिकारी आणि अंमलदार सहभागी झाले होते.

जातीय सलोखा राखण्यासाठी वरोरा पोलीस ठाण्यात २२ मार्च रोजी सायं. ७.३० ते ८.१५ या वेळेत शांतता समितीची बैठक घेण्यात आली.



### पोलीस प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

**संशयास्पद घटना किंवा अफवा आढळल्यास तातडीने डायल ११२ किंवा स्थानिक पोलीस ठाण्यात कळवा.सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट, ऑडिओ किंवा व्हिडिओ शेअर करण्याचे टाळावे.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे.पोलीस प्रशासनाने आगामी सण-उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारी घेतली असून, नागरिकांनी शांतता आणि जातीय सलोखा राखावा, असे आवाहन करण्यात आले.**

यात सर्वधर्मीय प्रतिष्ठित नागरिक, जातीय संघटनांचे पदाधिकारी, मस्जिद कमिटी सदस्य, मौलाना, मुस्लिम समाजाचे प्रतिष्ठित बांधव आणि शांतता समिती सदस्य उपस्थित होते.

बैठकीत नागरिकांनी सोशल मीडियावरील कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही माहिती खातरजमा केल्याशिवाय शेअर करू नये आणि संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

# १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी

## विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांना निवेदन सादर

**सोलापूर । प्रतिनिधी**

राजस्थान, छत्तीसगड, झारखंड आणि हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्यात आली असून, कर्नाटकमध्येही त्यासंदर्भात हालचाली सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेने विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



संघटनेच्या वतीने मागील सात वर्षांपासून जुनी पेन्शन योजनेसाठी सातत्याने आंदोलने, मोर्चे आणि निवेदने सादर करण्यात आली आहेत. महाराष्ट्र सरकारने कर्मचारीहिताचे अनेक निर्णय घेतले असले तरी, जुनी पेन्शन हा सध्याच्या कर्मचाऱ्यांसाठी सर्वात महत्त्वाचा विषय ठरला आहे.या निर्णयामुळे राज्यातील सुमारे पाच लाख कर्मचाऱ्यांना लाभ होणार असून, त्यांच्या भविष्याची सुरक्षितता अबाधित राहील. त्यामुळे सरकारने तातडीने सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली.यावेळी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरीश कडू, महेश होनकळसे आणि किरण शिंदे उपस्थित होते.

# शिरूर येथे बालकुमार साहित्य संस्थेच्या शाखेचे उद्घाटन संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेच्या शिरूर शाखेचे उद्घाटन रांजणगाव येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त तालुकास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था, पुणे चे अध्यक्ष माधव राजगुरू होते. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील कला परिसाप्रमाणे असून, त्यांचा योग्य उपयोग केल्यास जीवन अधिक समृद्ध होते, असे सांगितले.



कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, समाज प्रबोधनकार उत्तम अण्णा भोंडवे, शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिल पलांडे, महाराष्ट्र साहित्य परिषद शिरूरचे अध्यक्ष मनोहर परदेशी, केंद्रस्तरीय सदस्य सचिन बेंडभर, पदवीधर शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष कल्याण कोकाटे, केंद्रप्रमुख यशवंत रणदिवे, संचालक रामचंद्र नवले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेत स्वरा भुजबळ, आराध्या गावडे, नियती कटारिया, अधिरा शेळके, शौर्य कळसकर, आरुष चव्हाण, तेजस्विनी शिंदे, स्वरांजली भागवत, सह्याद्री वीर, देवांशी झांजे आदी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.गडकोट किल्ले संवर्धनासाठी योगदान दिल्याबद्दल शिवदुर्ग प्रेमी प्रतिष्ठानचे संस्थापक उमेश धुमाळ, तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण व योग शिबिराचे आयोजन केल्याबद्दल किरण अरगडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रिया माहूरकर यांनी केले. युवा उद्योजक मयूर करंजे यांनी विशेष सहकार्य केले.

## स्थानिक आमदारांवर टीका

# श्रेय लाटण्याचा प्रयत्न केविलवाणा-आनंद भरोसे

**परभणी । प्रतिनिधी**

स्थानिक आमदारांनी गेल्या दहा वर्षांत कोणते ठोस प्रश्न सोडवले आणि किती निधी आणला, हे स्पष्ट करावे, अशी मागणी शिवसेनेचे नेते आनंद भरोसे यांनी केली आहे. त्यांनी शनिवारी (दि. २२) पत्रकार परिषदेत आमदारांवर आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचा आरोप करत त्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र टीका केली.

भूमिगत गटार योजना, सुधारित पाणीपुरवठा योजना किंवा अन्य विकासकामे ही आम्ही सरकारदरबारी पाठपुरावा करून मंजूर करून घेतली. मात्र, आमदार महोदय त्या कामांचे श्रेय लाटण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत, असे भरोसे म्हणाले.महानगरपालिकेत सत्ता नसतानाही देवेंद्र फडणवीस यांनी ११० कोटी रुपयांचा पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मंजूर केला. भूमिगत गटार योजनेसाठी निधी मंजुरीसाठीही पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र, आमदारांनी त्याचे श्रेय घेण्यासाठी विधानसभेत राजीनाम्याची भाषा केली, असा आरोप भरोसे यांनी केला.पीकविमा, व्यापाऱ्यांचे नुकसानभरपाई प्रकरण, अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरण, बसपोर्ट प्रकल्प आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक आमदारांनी कोणताही ठोस पाठपुरावा केला नाही, असेही भरोसे यांनी सांगितले.एमआयडीसीतील पाणीपुरवठा योजनेसाठी ५० कोटी आणि नवीन उद्योग भवनासाठी ४० कोटी रुपयांचा निधी आम्ही खेचून आणला. मात्र, आमदार महोदयांना या संदर्भातील मंत्र्यांच्या बैठकीचाही थांगपत्ता नव्हता, असा आरोप त्यांनी केला.लोअर दुधना आणि जायकवाडी सिंचन प्रकल्पांमधून लाभक्षेत्रासाठी नियोजित पाणी वितरण होणार असल्याचे स्पष्ट असतानाही, स्थानिक आमदारांनी पत्रकबाजी करून दुसऱ्याच दिवशी घोषित झालेल्या निर्णयाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला, असेही भरोसे यांनी नमूद केले.पत्रकार परिषदेला भास्कर लंगोटे, माणिक पोंढे, बाळासाहेब पानपट्टे, गीता सूर्यवंशी, कल्पना दळवी, इक्कर पाटील आणि शेख शब्बीर आदी उपस्थित होते.

# सुनील घाटुळे यांना इंडोनेशियातील बाली येथे बिझनेस एक्सलन्स वॉर्ड




**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील अनगर गावचे नर्सरी उद्योजक सुनील विनायक घाटुळे यांना सिजेंटा, या जगप्रसिद्ध बिजोत्पादन कंपनीच्या वतीने बिझनेस एक्सलन्स वॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. २० मार्च रोजी इंडोनेशियातील बाली येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

घाटुळे यांची घाटुळे ग्रो सर्व्हिसेस ही फर्म भारतातील टॉप १० डिस्ट्रीब्युटर्स मध्ये निवडली गेली. त्यानंतर सिजेंटा कंपनीने मॅनेजिंग डायरेक्टर क्लबच्या मानाच्या पुरस्काराने त्यांचा गौरव केला.सुनील घाटुळे आणि त्यांचे पुत्र स्वानंद घाटुळे हे १५ वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध भागांतील भाजीपाला नर्सरी उद्योजकांना दर्जेदार बियाणे, ट्रे, कोकोपिट आणि रोप निर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल होलसेल दराने पुरवत आहेत. सन्मान स्वीकारल्यानंतर सुनील घाटुळे यांनी सर्व शेतकरी, नर्सरी उद्योजक, दुकानदार आणि कंपनी प्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे आभार मानले.

# इनरव्हील क्लब ऑफ भद्रावतीची OCV बैठक संपन्न





**भद्रावती । प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ भद्रावतीची OCV (ऑफिशियल क्लब व्हिजिट) बैठक क्लबच्या अध्यक्षा प्रा. प्रेमा पोटदुखे यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. याप्रसंगी क्लबच्या सामाजिक प्रकल्पाअंतर्गत यशवंतराव शिंदे कनिष्ठ महाविद्यालयात सॅनिटरी वेंडिंग मशीनचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमाचे उद्घाटन इनरव्हील क्लबच्या जिल्हाध्यक्ष जयश्री पोफळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधीर मोते, डॉ. ज्ञानेश हटवार, प्रा. माधव केंद्रे, प्रा. प्रेमा पोटदुखे, मनोज बांदुरकर, दोडके आदी मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी प्रायोजक म्हणून रोटेरियन सुनील पोटदुखे व धनराज आस्वले यांचे मोलाचे योगदान लाभले. विद्यार्थिनींच्या आरोग्य व स्वच्छतेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या या प्रकल्पाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.कार्यक्रमाच्या आयोजनात इनरव्हील क्लबच्या किर्ती गोहाणे, रश्मी बिसेन, प्राचार्य वर्षा धनोरकर, मनिषा ढोमणे, विभा बेहरें, वैशाली सातपुते, राजेश्री बत्तीनवार, कविता सुफी, विश्रांती उराडे, स्वाती चारी व त्रिशा नंदेश्वर यांनी विशेष सहभाग घेतला.

### दिव्यांग महिलाश्रय सहकार्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन

# सामाजिक एकजूटीसाठी 'साथी हाथ बढाना' हा संदेश महत्त्वाचा-आमदार सुधीर मुनगंटीवार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे ३२ हजार अपघात होतात, यात १८ ते २० हजार लोक दिव्यांग होतात. मात्र, दिव्यांग होण्यामागे केवळ नैसर्गिक किंवा अपघातजन्य कारणे नाहीत, तर समाजाची उदासीनताही तेवढीच जबाबदार आहे. त्यांचे जीवन संघर्षमय असले तरी ते समाजाला खऱ्या अर्थाने जीवन कसे जगावे, हे शिकवू शकतात. त्यामुळेच सामाजिक एकजूटीसाठी 'साथी हाथ बढाना' हा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह येथे ज्ञानार्चना अपंग स्नेह बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूर द्वारा दिव्यांग महिलाश्रयाच्या सहकार्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहूल पावडे, ज्ञानार्चना अपंग स्नेह बहुउद्देशीय संस्थेच्या संचालक श्रीमती अर्चना मानलवार, प्रा. डॉ. ज्योती राखुंडे, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी धनंजय साळवे, नागपूरचे खनीकर्म अधिकारी गजानन कांबळे, प्राचार्य जयश्री कापसे गावंडे, सुशीलाबाई मामेडवार आदींची उपस्थिती होती.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, समाजाच्या सकारात्मक सहकार्याने दिव्यांग व्यक्तींना आनंदी आणि सन्मानाने जीवन जगता येऊ शकते. अपघातांमुळे दिव्यांग झालेल्या नागरिकांची जबाबदारी सरकारने घ्यावी, या मागणीसाठी या संदर्भातील अशासकीय विधेयक पुढील विधानसभा अधिवेशनात मांडले जाणार आहे. दिव्यांगांच्या हक्कांसाठी सरकारने दिव्यांग मंत्रालय स्थापन केले असले तरी लोकाश्रय मिळाल्याशिवाय कोणताही प्रश्न सुटणार नाही. श्रीमती अर्चना मानलवार यांनी सर्व दिव्यांग सहकाऱ्यांसोबत भरीव कार्य करण्याचा दृढ संकल्प केला आहे. समाजाने सहकार्य केल्यास दिव्यांगांच्या जीवनात आनंद आणि सन्मान वाढेल, असेही आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले.

---

## कोर्टी प्रशालेचा 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' पुरस्काराने सन्मान



**सोलापूर । प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, कोर्टी हिला छत्रपती शिवाजी सांस्कृतिक कला क्रीडा मंडळ, मरवडे (ता. मंगळवेढा) यांच्या वतीने 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक विशाल शहाणे यांनी संस्थेचे अध्यक्ष सुरेश पवार, धनश्री उद्योग समूहाचे प्रमुख प्रा. शिवाजी काळुंगे, राज्य उपाध्यक्ष राजन सावंत आणि कवी इंद्रजित भालेराव यांच्या हस्ते स्वीकारला.शाळेतील वृक्षारोपण, स्वच्छता, सुविचारांनी सजलेली संरक्षक भिंत, संगणक व्यवस्था,सुशोभित प्रवेशद्वार, वर्ग सजावट, तसेच उत्कृष्ट स्नेहसंमेलन यामुळे शाळेची निवड करण्यात आली.या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी जयंत नलवडे, शिक्षण विस्तार अधिकारी नितीन कदम, मिनीनाथ टकले, केंद्रप्रमुख आदिनाथ देवकाते, सरपंच भाग्यश्री मेहेर, उपसरपंच पुष्पा जाधव, मेजर हनुमंत जाधव आणि अन्य मान्यवरांनी अभिनंदन केले. पुरस्कार वितरण समारंभास शिक्षक संतोष महाडीक, शिक्षिका दीपाली साळुंके, प्रियांका डहाळे, संगीता भंडारे उपस्थित होत्या.

---

## १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी

### मंत्री दत्तात्रय भरणे यांना शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन सादर

**सोलापूर । प्रतिनिधी**

राजस्थान, छत्तीसगड, झारखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये पुन्हा लागू झालेल्या जुनी पेन्शन योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांसाठीही ही योजना तातडीने लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने करण्यात आली.या मागणीसाठी संघटनेने नामदार दत्तात्रय मामा भरणे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर केले.





महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना मागील सात वर्षांपासून सातत्याने आंदोलने, मोर्चे आणि पाठपुरावा करत आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय सरकारने घ्यावा, अशी संघटनेची मागणी आहे.राज्यातील सुमारे पाच लाख कर्मचारी यामुळे लाभार्थी ठरणार असून, त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी हा निर्णय तातडीने लागू करावा, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.त्याचबरोबर धाराशिव जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २००५-०६ मधील शिक्षण सेवक सरळसेवा भरती प्रक्रियेतील दोन्ही जाहिराती या परस्पर संलग्न असल्याने त्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.सातव्या वेतन आयोगातील प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील (चटोपाध्याय) त्रुटी दूर करण्याचेही निवेदन देण्यात आले.या वेळी सोलापूर जिल्हा पेन्शन संघटनेचे जिल्हा नेते तात्यासाहेब जाधव, मधुकर शिंदे आणि विक्रम राऊत उपस्थित होते.

---

## स्पर्धा परीक्षेसाठी शालेय जीवनापासूनच तयारी आवश्यक-अमोल चिरुटकर

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली पाहिजे, असे प्रतिपादन हिंगणघाट पंचायत समितीचे बाल विकास प्रकल्प अधिकारी अमोल चिरुटकर यांनी केले. ते येथील अभिनव विचार मंचाच्या वतीने आयोजित मार्ग यशाचा या मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.





स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी नियोजनपूर्वक अभ्यास करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. चिरुटकर म्हणाले, प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी स्पर्धा परीक्षेला सामोरे जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सुरुवातीपासूनच कठोर मेहनतीसाठी तयार असले पाहिजे. शालेय जीवनातच नियोजनबद्ध अभ्यास करून, वाचन, लेखन, विश्लेषण आणि नियोजन या गुणांचा अवलंब केल्यास यश नक्की मिळवता येते.स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना स्टेट बोर्डाची सहावी ते बारावीची पुस्तके वाचण्याचा सल्ला दिला. याशिवाय भूगोल, अर्थशास्त्र आणि विज्ञानातील संकल्पना समजावून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वर्तमानपत्र वाचनाबाबत सांगताना ते म्हणाले की, बातम्या वाचून विसरून न जाता त्यामागील संदर्भ शोधून, माहितीचा साठा वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना यूपीएससी व एमपीएससी परीक्षांच्या स्वरूपातील तुलनात्मक फरक स्पष्ट करून सांगितले. स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी प्रभावी वेळ व्यवस्थापन, आत्मविश्वास, स्मार्ट अभ्यास पद्धती, अवांतर वाचन आणि नैराश्य टाळण्यावर त्यांनी भर दिला.कार्यक्रमात डी-सॉफ्ट कोचिंग अँड कौन्सिलिंग सेंटरचे संचालक यांनी आयटी क्षेत्रातील करिअर संधी, विशेषतः सायबर सिक्युरिटी आणि संगणक विज्ञान क्षेत्रातील कौशल्यांवर मार्गदर्शन केले. तसेच इम्रान सर यांनी व्यक्तिमत्त्व विकास व करिअर मार्गदर्शनावर प्रेरणादायी सत्र घेतले.समारोपाच्या सत्रात सर्वेशा कुडमेथी, एकनाथ कारवटकर, वंश, श्लोक मुंडे, कुंभलकर या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत देवढे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. चंद्रशेखर रेवतकर यांनी केले.कार्यक्रमास विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली.

---

## पळसगाव (खुर्द) येथे १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत समस्या निराकरण शिबिर संपन्न

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी निर्धारित केलेल्या १०० दिवस कृती आराखड्याच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत तहसील कार्यालय नागभीड व ग्रामपंचायत कार्यालय पळसगाव (खुर्द) यांच्या संयुक्त विद्यमाने समस्या अवलोकन व निराकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. तहसीलदार प्रताप वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नायब तहसीलदार कावळे यांच्या उपस्थितीत गावातील विविध समस्या जाणून घेण्यात आल्या आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.





शेतकऱ्यांना ग्रीस्टॅक अंतर्गत फॉर्मर आयडी तयार करण्याचे आवाहन करण्यात आले, तसेच लक्ष्मी मुक्ती योजनेचे फायदे समजावून नागरिकांनी आपल्या पत्नीचे सह-हिस्सेदार म्हणून नाव दाखल करण्यासाठी अर्ज दाखल करावा असे सांगण्यात आले. जिवंत सातबारा मोहीम राबवून अपात्र नोंदी कमी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा आणि अन्य सुविधांविषयी ग्रामपंचायतीच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.महसूल, कृषी, वन, आरोग्य आणि वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विविध शासकीय योजनांची माहिती दिली. गर्भवती महिलांसाठी आवश्यक लसीकरण, बालकांसाठी आरोग्य योजना, महसूल विभागाच्या विविध योजनांची माहिती आणि सामूहिक वनहक्क दाव्यांसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार कावळे होते. सरपंच निरंज सिदमशेटीवार, जनकापूर सरपंच वैशाली गायधने, मंडळ अधिकारी सुभाष बोड्डावार, बालविकास अधिकारी शीला गेडाम, कृषी विभागाचे संजय पाकमोडे, आरोग्य विस्तार अधिकारी अरुण घाटोळे, ग्रामसेवक बी.आय. कोरडे, तलाठी मनोजकुमार भोयर व विकास मेश्राम, पुरवठा निरीक्षक चांदेकर, वैद्यकीय अधिकारी खोब्रागडे आदींसह अनेक अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन सुभाष बोड्डावार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रवीण रामटेके यांनी केले. या शिबिराला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

---

### कैलास नागरे यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी आणि सिंचनाच्या

# फेरनियोजन रद्द करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन

**गंगाखेड । प्रतिनिधी**

शासनाचा 'युवा शेतकरी पुरस्कार' प्राप्त प्रयोगशील शेतकरी कै. कैलास नागरे यांच्या कुटुंबाच्या पुनर्वसनासह त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी मुख्यमंत्री महाराष्ट्र शासनाने घ्यावी, तसेच जायकवाडी धरणातून सिंचनासाठी वाटा घटवणारे फेरनियोजन रद्द करावे, या मागण्यांसाठी आज तहसील कार्यालयावर किसान सभेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार गंगाखेड यांच्या मार्फत मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देण्यात आले.



शिवणी आरमाळ (ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) येथील प्रयोगशील शेतकरी कैलास नागरे यांनी १४ मार्च रोजी शेतात विष प्राशन करून आत्महत्या केली. ही आत्महत्या नसून हक्काच्या पाण्यासाठी लढणाऱ्या शेतकऱ्याने दिलेले बलिदान असल्याचे किसान सभेच्या निवेदनात नमूद करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने २०२० मध्ये त्यांना 'युवा शेतकरी पुरस्कार' प्रदान केला होता.कैलास नागरे यांच्या कुटुंबात पत्नी, दोन मुली व एक मुलगा असून, मोठी मुलगी लातूर येथे शिक्षण घेत आहे. त्यांनी आत्महत्या आर्थिक विवंचनेतून किंवा कर्जबाजारीपणामुळे केली नसून, सिंचनाच्या पाण्यासाठी सरकारच्या दुर्लक्षामुळे केली, असे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले. आत्महत्येपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावे लिहिलेल्या पत्रात पंचक्रोशीत शेतीसाठी हमीने पाणी द्या, अशी मागणी केली होती. १८ वर्षांच्या शेतीप्रवासात केवळ ४ वर्षेच समाधानकारक उत्पादन मिळाल्याची खंत त्यांनी पत्रात व्यक्त केली होती.संत चोखामेळा जलाशय व खडकपूर्णा प्रकल्पातून १०३.६४ दलघमी पाणी उपलब्ध असतानाही, त्यातील ४०.५३ दलघमी पाणी आरक्षित ठेवण्यात आल्याने ७६१२ हेक्टर सिंचन क्षेत्र कपात करण्यात आले आहे. शिवणी आरमाळ लघु सिंचन प्रकल्पात खडकपूर्णा प्रकल्पातून अतिरिक्त पाणी वळवावे, या मागणीसाठी १५ डिसेंबर २०२४ पासून अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले होते. २० डिसेंबर रोजी प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र प्रत्यक्ष कृती न झाल्याने पुन्हा आंदोलन सुरू करण्यात आले.२५ जानेवारी २०२५ रोजी नियोजन मंडळाच्या बैठकीत १ कोटी ९१ लाख निधी मंजूर करण्यात आला, परंतु ५०० मीटर चारीसाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. या निर्णयामुळे मराठवाड्यातील हजारो हेक्टर शेती कोरडवाहू होत असून, शेतकऱ्यांना आत्महत्येच्या खाईत लोटले जात आहे.यावेळी किसान सभेचे जिल्हा सेक्रेटरी कॉ. ओंकार पवार, सुरेश इखे, कॉ. शिवाजी कदम, भाई गोपीनाथ भोसले, लक्ष्मण लटपटे, योगेश फड, ॲड. अजय मुंढे, जानकीराम पवार, प्रमोद मस्के आदी उपस्थित होते.

---

## नातवंड खेळविण्याच्या वयात पतीने केले दुसरे लग्न

### ४९ वर्षीय महिलेची तक्रार





**वैजापूर । प्रतिनिधी**

कोरडगाव येथील ४९ वर्षीय महिलेने शिऊर पोलीस ठाण्यात आपल्या पतीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. नातवंड खेळविण्याच्या वयात पतीने एका युवतीसोबत विवाह केल्याचे समोर आले असून, या प्रकरणी २० मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारदार महिला सौ. पुष्पा राजाराम बागुल (रा. कोरडगाव, ता. वैजापूर, ह.मु. राणा प्रताप चौक, न्यू सिडको, नाशिक) यांनी पोलिसांकडे दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे लग्न ८ मे १९९६ रोजी राजाराम विश्वनाथ बागुल (रा. कोरडगाव, ह.मु. नाशिक) यांच्यासोबत झाले होते. लग्नाच्या सुरुवातीला संसार सुरळीत सुरू होता, मात्र नंतर पतीकडून माहेराहून पैसे आणण्याची मागणी, शिवीगाळ आणि मारहाणीचा प्रकार सुरू झाला.

सहा महिन्यांपूर्वी पतीने घरातून हाकलून दिल्याचा आरोप महिलेने केला आहे. काही दिवसांपूर्वी पतीने नाशिकमधील एका युवतीशी विवाह केला असल्याची माहिती मिळाल्यावर पुष्पा यांनी शिऊर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.या तक्रारीवरून राजाराम बागुल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार किशोर आघाडे करीत आहेत.

# शिक्षक, शिक्षण आणि राष्ट्रहितासाठी शिक्षक परिषद दृढपणे उभी राहणार; आ.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला विश्वास

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

समाजाच्या सर्वच स्तरांवर महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या हक्कांची जपणूक करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव केला. शिक्षकहित, शिक्षणहित आणि राष्ट्रहित या त्रिसूत्रीवर कार्य करणारी ही परिषद शिक्षकांच्या हक्कांसाठी कायम दृढपणे उभी राहील, असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय सभागृहात जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार नागोजी गाणार, सरिताताई सोनकुसरे, डॉ.मंगेश गुलवाडे,डॉ. कल्पना गुलवाडे, नम्रताताई ठेमस्कर, पूजाताई चौधरी, संध्याताई गीरडकर, विवेक आंबेकर, विजयालक्ष्मी पोरेड्डीवार आदींची उपस्थिती होती.यावेळी आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, स्त्री ही सृजन, सामर्थ्य आणि संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. तिच्या आरोग्याची व सन्मानाची काळजी घेणे, हीच खऱ्या अर्थाने महिला दिनाची सार्थकता आहे. महिला आज प्रत्येक क्षेत्रात सक्षमतेने पुढे जात आहेत. विशेषतः आर्थिक व्यवस्थापनात त्यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात महिलांची भूमिका मोठी असून, त्या काटकसर करून आपल्या उत्पन्नाच्या सुमारे २६ टक्के रक्कम शिल्लक ठेवतात. त्यामुळे त्यांचे आर्थिक नियोजन कौशल्य देशाच्या प्रगतीसाठी उपयुक्त ठरत आहे.ते पुढे म्हणाले की, शिक्षकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. कॉन्व्हेंट शाळांतील शिक्षकांना अल्प मानधनावर काम करावे लागत आहे. यासंदर्भात कायदे अस्तित्वात असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात शिक्षकांच्या वाढत्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी संसदीय आयुधांचा प्रभावी वापर करून न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असेही आ. मुनगंटीवार यांनी नमूद केले.या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा सामाजिक उपक्रम शिक्षक परिषदेने हाती घेतला. या स्तुत्य उपक्रमासाठी आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कौतुक केले. कार्यक्रमात डॉ. कल्पना गुलवाडे यांनी महिलांच्या आरोग्यविषयक उपयुक्त माहिती उपस्थितांसमोर मांडली.



## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास अटक

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड दिनांक २२/०३/२०२५ रोजी १६/३० वाजताचे सुमारास अल्पवयीन मुलगी बस स्टँड उमरखेड येथे हजर असताना बस चालक आरोपी संदीप विठ्ठलराव कदम वय ४० वर्षे राहणार महात्मा फुले वार्ड उमरखेड हा अल्पवयीन मुलीस बोलला की तू कुठे जात आहे असे बोलून तू माझ्यासोबत नांदेड येथे चल म्हणाल्या वरून बसमध्ये बसवून नांदेड येथे गेले. आरोपीची ड्युटी ही नांदेड ते नागपूर या बसवर असल्याने तो अल्पवयीन मुलीला सोबत घेऊन नागपूर येथे निघाला दिनांक २३/०३/२०२५ रोजी ते सकाळी अंदाजे ०५/०० वाजता हे सुमारास नागपूर बस स्थानक येथे पोहोचले नंतर आरोपीने अल्पवयीन मुलीला त्याचे रूमवर घेऊन गेला व त्याचे रूमवर कोणीही नसल्याने त्याने जबरदस्तीने अल्पवयीन मुलीवर शरीर संबंध केले त्यानंतर आरोपी हा अल्पवयीन मुलीला घेऊन सोलापूर बसणे



सोलापूर कडे जात आहे वगैरे माहिती प्राप्त होतात माननीय वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली तीन तयार करून सदर आरोपी हा उमरखेड बस स्थानक येथे येताच त्याच तातडीने चौकशी कामे ताब्यात घेतले आहे. तसेच अल्पवयीन मुलीचे जमाने रिपोर्ट वरून पो . स्टे.उमरखेड येथे अप क्र.१७७/२०२५ कलम १३७(२),६४(१), ९६बीएनएस, सह कलम ४,८, १२बा. लैं.अ. अ. सहकलम३(२), व्ही ए ३(२), व्हि ३(१),डब्ल्यू (ळ)(ळळ) अ.जा.ज कायदाप्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

सदर कारवाई यवतमाळ पोलीस अधीक्षक कुमार चिंता साहेब, माननीय अप्पर अधीक्षक पियुष जगताप , उपविभागीय पोलीस अधिकारी बी जे हर्षवर्धन, सा.पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी शिंदे, सपोनी सारिका राऊत, पोउपनी धरणे,पोउपनी सागर इंगळे, पोशी/१३७, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास उपविभागीय अधिकारी बी जे हर्षवर्धन हे करीत आहेत.

## आदिनाथ कारखान्यातील निधीचा हिशोब जाहीर करावा–महेश चिवटे यांची मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**

आदिनाथ सहकारी साखर कारखान्यात मळी विक्री व निवडणुकीच्या काळातील शेअर्स व थकबाकीमधून जमा झालेल्या निधीचा स्पष्ट हिशोब जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केली आहे. कार्यकारी संचालक अरुण बागांवर यांच्याकडे यासंबंधी विचारणा करण्यात आली असता, त्यांनी फोन न उचलता उडवाउडवीची उत्तरे दिली, असा आरोप चिवटे यांनी केला. त्यामुळे प्रशासकीय संचालक डॉक्टर वसंतराव पुंडे यांनी हा हिशोब द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



गेल्या हंगामात शेतकऱ्यांनी आदिनाथ साखर कारखान्याला ऊस पुरवला, परंतु अजूनही त्यांच्या थकबाकीची रक्कम मिळालेली नाही. कारखान्यात सध्या मोठ्या प्रमाणात निधी शिल्लक असूनही, शेतकऱ्यांना फक्त १३४० प्रति टन दराने पैसे देऊन उर्वरित रक्कम हडप करण्याचा डाव काही लोक आखत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.कारखान्यातील निधीचा वापर प्रवास खर्च, भत्ते, निवडक कर्मचाऱ्यांचे वेतन आणि ठराविक व्यापाऱ्यांचे देयके भागवण्यासाठी केला जात आहे, असा आरोप होत आहे. त्यामुळे प्राधान्याने शेतकऱ्यांचे पैसे द्यावेत आणि किमान २५०० प्रति टन दराने रक्कम अदा करावी, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी ऊसाच्या रकमेचा हिशोब मागितल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कारखान्यात पैसे शिल्लक असतानाही शेतकऱ्यांना पैसे देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने, या प्रशासकीय मंडळाला कोण जाब विचारणार? असा सवाल जनार्दन समाधान घरगुडवे यांनी उपस्थित केला आहे.

शेतकऱ्यांनी कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, जर पैसे लवकर दिले गेले नाहीत, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## निस्वार्थीपणे रुग्णसेवा करणाऱ्या भोईर दाम्पत्याचा निक्षय मित्र पुरस्काराने सन्मान



**बदलापूर । प्रतिनिधी**

रुग्ण हीच ईश्वर सेवा या तत्त्वावर काम करणाऱ्या किरण भोईर आणि डॉ. रचना भोईर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना निक्षय मित्र पुरस्काराने सन्मानित केले आहे. क्षयरोगमुक्त बदलापूर हा संकल्प मनाशी बाळगून गेल्या सहा वर्षांपासून ते टीबी रुग्णांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्यरत आहेत.

बदलापूर परिसरातील क्षयरोगी प्रामुख्याने गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील आहेत. सरकारी रुग्णालयांत त्यांना मोफत औषधोपचार मिळतो, मात्र पोषक आहाराचा अभाव असतो. ही गरज ओळखून किरण भोईर आणि डॉ. रचना भोईर यांनी स्वतःच्या खर्चाने या रुग्णांना पोषक आहार पुरवण्याचा उपक्रम हाती घेतला. सलग सहा वर्षांपासून त्यांनी अनेक टीबी रुग्णांना सकस आहार उपलब्ध करून दिला आहे.भोईर दाम्पत्याच्या या सेवेची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना निक्षय मित्र पुरस्कार जाहीर केला असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. समाजासाठी प्रेरणादायी ठरलेल्या त्यांच्या कार्यामुळे टीबी मुक्त अभियानाला मोठी मदत मिळत आहे.

## मूल शहरात पहिल्यांदाच आढळला इशियन पाम सिव्हेट

### संजीवन पर्यावरण संस्थेच्या मदतीने जंगलात सोडला



**मूल । प्रतिनिधी**

शहरातील वार्ड क्रमांक १४ मध्ये दुसऱ्या मजल्याच्या बांधकामादरम्यान इशियन पाम सिव्हेट (मसन्या ऊद) हा दुर्मिळ वन्यजीव आढळून आला. घरमालक किशोर ठेंगणे यांनी तात्काळ संजीवन पर्यावरण संस्थेला माहिती दिली. संस्थेच्या सदस्यांनी घटनास्थळी पोहोचून या प्राण्याला सुरक्षितपणे पकडले आणि वनविभागाच्या मदतीने जंगलात सोडले.

हा प्राणी निशाचर असून त्याचे आयुष्य साधारण १५ ते २५ वर्षे असते. हे प्राणी सहसा जंगलातील झाडांच्या पोकळीत राहतात, मात्र जंगल कमी होत असल्याने ते मानवी वस्तीत आढळण्याचे प्रमाण वाढले आहे.संजीवन पर्यावरण संस्थेच्या सदस्यांनी मूल शहरात पहिल्यांदाच अशा प्रकारचा वन्यजीव जिवंत पकडल्याची नोंद केली आहे. या घटनेमुळे वन्यजीव संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यात असे प्राणी आढळल्यास वनविभाग किंवा पर्यावरण संस्थेला तातडीने कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय सहाय्यक पल्लवी सरोदे यांचे अपघाती निधन

**ठाणे । प्रतिनिधी**

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या स्वीय सहाय्यक पल्लवी सरोडे (३७) यांचे रविवारी हरिहरेश्वर समुद्रकिनारी अपघाती निधन झाले. पल्लवी सरोदे या कार्यालयीन सहकाऱ्यांसह सहलीसाठी हरिहरेश्वरला गेल्या असता समुद्राच्या लाटांमध्ये अचानक ओढल्या गेल्या, त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे ठाणे जिल्हा प्रशासनात शोककळा पसरली असून, जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र दु:ख व्यक्त केले आहे. पल्लवी सरोदे या २०१२ मध्ये लिपिक पदावर रुजू झाल्या होत्या. मार्च २०२४ मध्ये सहाय्यक महसूल अधिकारी पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्या जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या प्रामाणिक, मेहनती आणि मदतशील स्वभावामुळे जिल्हा प्रशासनातील सर्व कर्मचाऱ्यांमध्ये त्या अत्यंत लोकप्रिय होत्या. पल्लवी सरोदे यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण प्रशासन हळहळ व्यक्त करत आहे. त्यांच्या पश्चात पती, सासू-सासरे आणि १३ वर्षीय मुलगा आहे.



## पूर्वतयारीबाबत संबंधित यंत्रणेचा आढावा

# महाकाली यात्रा महोत्सवाच्या परिसराची जिल्हाधिका-यांकडून पाहणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर शहरात पुढील आठवड्यापासून सुरू होणा-या माता महाकाली यात्रा परिसराची पाहणी करून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी विविध विभागाच्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.महाकाली मंदीर परिसरात नुकत्याच झालेल्या या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपविभागीय अधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपील पालिवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, तहसीलदार विजय पवार, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, पोलिस निरीक्षक (वाहतूक) प्रवीणकुमार पाटील, योगेश पारधी (विशेष शाखा), महाकाली मंदीर विश्वस्त मंडळाचे सुनील महाकाळे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख उपस्थित होते.



चंद्रपूरचे आराध्य दैवत असलेली माता महाकाली यात्रा महोत्सव ३ एप्रिलपासून सुरू होत आहे. सदर यात्रा १५ एप्रिलपर्यंत राहणार असून ११ ते १५ एप्रिल या कालावधीत मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, महाकाली यात्रेकरीता चंद्रपुरात परराज्यातून तसेच विविध जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. बाहेरून येणा-या बसेसची व्यवस्था तसेच प्रशासनाने नियोजित केलेल्या जागेवरच पार्किंग व्यवस्था असली पाहिजे. भाविकांसाठी आवश्यक मुलभूत सोयीसुविधा जसे पिण्याचे पाणी, मोबाईल टॉयलेट, दैनंदिन स्वच्छता व इतर अनुषंगीक बाबी मनपाने उपलब्ध करून द्याव्यात. नियमित स्वच्छतेसाठी मनपाने अधिकारी - कर्मचा-यांच्या ड्युटी लावाव्यात.नदीवर आंघोळ करतांना कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणने शोध व बचाव पथक तैनात ठेवावे. यात्रा कालावधीत हवामानाची माहिती अवगत करावी तसेच जिल्हा नियंत्रण कक्षासोबत (०७१७२-२५००७७) समन्वय ठेवावा. महावितरणने यात्रा परिसरात अखंडीत वीज पुरवठा सुरू राहील, याची दक्षता घ्यावी. आरोग्य विभागाने रुग्णवाहिकेसह २४ बाय ७ आरोग्य पथक तैनात ठेवावे, अशा सुचना त्यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिका-यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर महानगर पालिका, राज्य परिवहन मंडळ, आरोग्य विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पोलिस विभाग आदींचा आढावा घेतला. तसेच मंदीर परिसरातील भाविकांसाठी असलेला दर्शनाचा मार्ग, वाहनांची पार्किंग, नदी काठावरील आंघोळीचे ठिकाण, परिसरात लागणा-या दुकानांची जागा आदींची पाहणी केली.

## फार्मर कप स्पर्धेत वैजापूर तालुक्यातील शंभूराजे शेतकरी गटाचा प्रथम क्रमांक; हॅट्रिक विजयाची नोंद



**वैजापूर । प्रतिनिधी**

पाणी फाउंडेशनतर्फे आयोजित फार्मर कप स्पर्धेत बळ्हेगाव येथील शंभूराजे शेतकरी गटाने प्रथम क्रमांक पटकावत हॅट्रिक विजयाची नोंद केली आहे. २०२२, २०२३ आणि २०२४ या तीनही वर्षांमध्ये सलग प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान या गटाने मिळवला आहे.

स्पर्धेअंतर्गत उत्कृष्ट जलसंधारण उपक्रम, शाश्वत शेती तंत्रज्ञान आणि सामूहिक सहभागाच्या जोरावर शंभूराजे शेतकरी गटाने तालुक्यातील सर्व गटांना मागे टाकत विजय मिळवला. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी ५०,००० आणि सन्मानचिन्ह पाणी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आमिर खान, किरण राव आणि कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. गावभर या गटाच्या यशाचे कौतुक होत असून, तालुक्यातील इतर शेतकरी गटांसाठी हा आदर्श ठरत आहे. स्पर्धेच्या उपविजेत्यांमध्ये मनोली येथील जय योगेश्वर शेतकरी गट आणि पेंडेफळ येथील प्रगतिशील महिला शेतकरी गट यांचा समावेश आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .